## रसिका महाविद्यालयाचा योगा संघ विद्यापीठात प्रथम

**प्रतिनिधी** | देवणी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन योगा स्पर्धा दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडला. या स्पर्धेत रसिका महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले आहे.

मुलाच्या संघाने विद्यापीठातून प्रथम क्रमांक पटकावला व मुलीच्या संघाने विद्यापीठातून द्वितीय क्रमांक पटकावला तर व्यक्तिगत क्रीडा प्रकारात पुरुष गटातून गायकवाड कृष्णा याने विद्यापीठातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच व्यक्तिगत क्रीडा प्रकारात महिला गटातून कांबळे निकिता विद्यापीठातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. पुरुषांच्या संघात गायकवाड कृष्णा (कर्णधार) करण पवार, आदित्य गायकवाड, दावणगावे दत्ता, पाशीमे सोमेश्वर, बुद्धीराज शिंगे व महिलांच्या संघात कांबळे अंकिता, कांबळे निकिता (कर्णधार) ,पाटील सरस्वती आदींचे मार्गदर्शन लाभले.

**मार्गदर्शन** • विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, मोबाइलचा सुयोग्य वापर करण्याची माहिती

# शाहू महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स देताहेत शाळा-कॉलेजमध्ये सायबर साक्षरतेबाबत धडे

**प्रतिनिधी** | लातूर

शहरातील नामांकित राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या वतीने सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. दरम्यान मागील काही वर्षांपासून वाढलेला इंटरनेटचा वापर आणि त्या अनुषंगाने वाढत असलेले सायबर गुन्ह्याला कसे रोखता येईल. यासाठी मागील ३ वर्षांपासुन महाविद्यालयाच्या वतीने आगळा-वेगळा उपक्रम लातूर जिल्ह्यात यशस्वीरित्या राबवला जात आहे. समाजात सायबर सुरक्षिततेची जाणीव वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून त्यांना सायबर वॉरियर्स म्हणून नियुक्त केले जात असून हे सायबर वॉरियर्स ही लातूर शहर आणि परिसरातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, मोबाइलचा सुयोग्य वापर त्याचबरोबर मोबाईल वापरताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करत आहेत.

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हे या उपक्रमाचे नाव आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी. सी.एस. व बी.एस्सी.सी.ए.च्या विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड केली जाते. यावर्षी या उपक्रमांसाठी २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. हे विद्यार्थी लातूर शहर तसेच परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर सुरक्षा कार्यशाळा घेत आहेत.

या कार्यशाळांमधून फिशिंग, डिजिटल अरेस्ट, आर्थिक फसवणूक, सोशल मीडियाद्वारे फोटो किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांसारख्या सायबर गुन्ह्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. तसेच अनोळखी मेसेज व लिंकवर क्लिक न करणे, वैयक्तिक माहिती शेअर न करणे, आणि अशा गुन्ह्यांची सायबर सेलमध्ये नोंदणी कशी करावी याची माहिती देणे. तसेच १९३० या हेल्पलाईन क्रमांकाबददल जागरूकता निर्माण केली जात आहे.

इंटरनेटच्या अतिवापरामुळे निर्माण होणारा मानसिक ताण व चिडचिडेपणा या संदर्भातही मार्गदर्शन केले जात आहे. शाळा महाविद्यालयामधून या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, अजय गायत्री केसकर, दिपू सिंह यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले. या कार्यासाठी व छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पंढरीनाथ देशमुख, सचिव प्राचार्य अनिरुध्द जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपस्थित होते.

### सायबर गुन्ह्यांविरोधात लढा देण्याची आज गरज

*आज प्रत्येकजण स्मार्टफोन, इंटरनेटचा वापर करत आहे. दरम्यान यामुळे फायद्यांबरोबरच अनेक नुकसानदायक घटनाही घडत आहेत. यामध्ये सायबर गुन्हे, ऑनलाईन लूट, फसवणूक आदी गैरप्रकार घडत आहेत. तरी अशा सायबर गुन्हयांविरोधात लढा देण्यासाठी शाहू महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स मैदानात उतरले आहेत. तरी हा उपक्रम सायबर वॉरियर्सनी यशस्वीपणे राबवावा.*

**डॉ. महादेव गव्हाणे,** प्राचार्य